डॉ. श्री. र. आपटे

पुनर्भेट

# आरोग्यशास्त्राचे आद्यप्रणेते भगवान धन्वंतरी

जो शल्यपारंगत आहे तो धन्वंतरी असा धन्वंतरी शब्दाचा अर्थ आहे, शंख, चक्र, अमृतकलश व जलौका (जळू) ही त्याची आयुधे असतात. जखमांवर टाके घालण्यासाठी जळूचा कडकडून चावा घेतलेल्या अवस्थेतील अवशेष उपयोगात आणण्याची कला फार प्राचीन आहे. विष्णुस्वरूप असल्याने शंक, चक्र आले, तर धन्वंतरीची ज्ञानपरंपरा ब्रह्मा → प्रजापती → दक्ष → अश्विनीकुमार → इंद्र → धन्वंतरी अशी वेदिक शास्त्रात सांगितली आहे. इंद्राने रोगनिवारण शास्त्राची माहिती धन्वंतरी यांना दिली. धन्वंतरी यांच्या अलौकिक प्रतिभेने नाना औषधींचे सार अमृताच्या रूपाने देवांना प्राप्त झाले व देव जरामृत्यू रहित झाले म्हणून अमृतकलश हे आयुध मानले जाते. तर



धन्वंतरी राजवैद्य मानले जातात. धन्वंतरी यांनी जवळजवळ तेरा ग्रंथ लिहिले आहेत.

धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी उत्सव मोठ्या आदराने व निष्ठेने भारतात सर्वत्र साजरा केला जातो. धन्वंतरीचे एक वंशज बनारस अथवा काशीचे राजा दिवोदास मानले जातात. त्यांनी दीर्घायुष्याचा वेद (आयुर्वेद) लोककल्याणार्थ सुश्रुताचार्य व त्यांच्या सहकाऱ्यांना शिकविला असे मानले जाते. मूळ आयुर्वेदात एक लक्ष श्लोक असावेत, परंतु जनसामान्यांना समजण्यास सोपे जावे म्हणून त्याची आठ भागात विभागणी केली गेली ती पुढीलप्रमाणे–

१) काय चिकित्सा म्हणजे आजकालचे मेडिसिन
२) कौमारभृत्य म्हणजे पेडिॲट्रिक्स
३) रसायनशास्त्र म्हणजे आजचे फारमॉकॉलॉजी
४) शल्य किंवा सर्जरी
५) शालाक्य म्हणजे नाक, कान, घसा, डोळा इ. खांद्याच्या वरच्या भागांचे शात्र.
६) अगदतंत्र आजचे फॉरेन्सिक शास्त्र.
७) वाजीकरण किंवा कामशास्त्र व
८) भूतविद्या.

या आठ शाखा आजही प्रचलित आहेत. त्यावरून भगवान धन्वंतरी यांच्या अतुलनीय ज्ञानाची कल्पना येते.

घरोघरी धन्वंतरीच्या शिकवण्याप्रमाणेच भारतात घरोघरी सायंकाळी मंगलदीप लावण्याची प्रथा पडली, आरोग्याचा नंदादीपच जणू. आजही ही प्रथा अनेक भागात टिकून आहे.

◆